२१३२




म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१३

REFBK-0019075
REFBK-0019075



ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

|| अमेय कविता ||

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १९०७५
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0019075
REFBK-0019075

# राजपुत्र आणि डार्लिंग

ग्रेस

प्रकाशन क्रमांक नऊ

© डॉ. लीला माटे

प्रकाशक / मनोहर पिंपळपुरे / अमेय प्रकाशन / रुईकर मार्ग / नागपूर २
मुद्रक / चिं. स. लाटकर / कल्पना मुद्रणालय / टिळक रोड / पुणे / ३०
मुखपृष्ठ, चित्रे व मांडणी, सुभाष अवचट /
प्रथमावृत्ती, १ जानेवारी १९७४ / किंमत / तेरा रुपये पन्नास पैसे



८१२२६ / 2932
३०।७।७४

# राजपुत्र
# आणि
# डार्लिंग



जी. ए. कुलकर्णीला,
ज्याने मला मित्र
मानले.

'संध्याकाळच्या कविता' हा माझा पहिला कवितासंग्रहा रामदास भटकळने काढला. परवा त्याची दुसरी आवृत्ती निघाली. त्यात न आलेल्या आणि नंतरच्या (१९७० पर्यंतच्या) कवित. 'चंद्रमाधवीच्या प्रदेशा'त आहेत. 'राजपुत्र आणि डार्लिंग' पूर्वी हा संग्रह बाहेर यायला हवा होता. मग क्रम नीट लागला असता. लवकरच रामदास 'चंद्रमाधवीचे प्रदेश' आणि 'चर्चबेल' हे ललित लेखांचे पुस्तक छापतोय.

माझ्या वृत्तरचना आणि लिरिक्स् की काय म्हणतात ते—मी जाणीवपूर्वक 'राजपुत्र आणि डार्लिंग'मध्ये घेतलेल्या नाहीत. त्या मोकळ्याच आहेत. त्यामुळे 'राजपुत्र आणि डार्लिंग'च्या अनुभवाची पातळी एकसंध राहू शकेल अशी माझी कल्पना आहे. इतर कविताही याच अनुभवव्यूहात शिरणाऱ्या आहेत असे मला वाटते. आपले सहोदर अगोदरच जन्माला येऊन गेलेले असतात; काही आपल्या काळात सापडतात. त्यांच्या संकेतांनी आपल्या व्यक्तित्वाची जशी पुनर्घटना होते तसेच आपल्या अनुभवाला नवे संकेत मिळतात. माझ्यापुरती ही प्रक्रिया 'राजपुत्र आणि डार्लिंग'मध्ये फार ठळकपणे घडून

आली असावी असा माझा अंदाज आहे. काही वस्तु, घटना, चिन्हे, प्रतिमा, प्रतीके आणि संकेत माझ्या कवितेत सतत येतच राहणार. आयुष्यभर. इंग्रजी काव्यावतरणे 'राजपुत्रात' एमिली ब्राँटेचे आणि इतरत्र एमिली डिकन्सन्‌ची आहेत.

सुभाषने चित्रे काढलीत. स्वतःचे पुस्तक समजून. ही समरसता माझ्या लेखी फार मोठी आहे. माझा मित्र आहे तो. अमेयचे मनोहर पिंपळापुरे आणि श्रीपाद मुंजे हे माझ्या पिढीचे लोक. आम्ही मित्र आहोत सगळे. एक विशिष्ट ध्येय मनाशी बाळगून ही जिद्दीची पोरे या क्षेत्रात उतरली आहेत. मी त्यांच्याबरोबर आहे. केवळ हे पुस्तक त्यांना देऊनच नव्हे – एरवीही.

ग्रेस





मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
वर्गक्रम ... C72 2 ... दि: ... 6/1/64
क्रमांक ... 2732 ... नोंद दि 30/1/62

*It might be lonelier*
*Without the loneliness*

राजपुत्र / संध्यामठ / मुलगी / नूरजहाँ / झाडांची टिपणे / गुलाब वाळवण्याची गोष्ट / पहाडी थिएटर / आगगाडीच्या कविता / डॉ. झिवॅगोची कविता / मृत्युघरातील टिपणें / घरातल्या कविता / गुड नाइट मिसेस् नॅली डीन / रिॲक्शनची कविता : कै. तुकाराम वाल्होबा आंबिले / एकान्त / दफनविधी / डार्लिंग /



शिशिरमुद्रांना जपण्याचा प्रश्न
सुरक्षित राहू शकतो.
तळहातांवरून शीळ गेली की
पानगळीचा कोमल वारा ?
भाला फेकण्याच्या शर्यतीत थकलेले घोडे
कुरण टाकून भटकतात.
पाहता पाहता, चार दोन माणसे; संध्याकाळच्या
ढगांना खांद्यावर घेऊन दूर
निघून जातात.
फुलांच्या जागा माहीत असूनही
रस्त्यावरून हटत
नाही;
कोणाच्या आदेशाची वाट पहात
उभे आहे झाड ?
पाऊस हुकलेली माझ्या मनोगतांची
रक्तमयी लहर.
छोटेसे दुःख घेऊन मी नीट उभा
राहू शकेन असे शोधतोय्
शहर.



# राजपुत्र

दा. क्र. १९०७५

## १

ऑर्केस्ट्रा. आणि त्याचा एक एक सुटत जाणारा वाद्यावयव.
मनगटावरील सुन्न शिरात शिरलेली
कॅथेड्रल धून.



कधी तरी या कवितेचा अर्थ स्पष्ट होत जाईल.
किती तरी शहरे, किती तरी खेडी आकाशाखाली
निमूटपणे सज्ज.
महासागरावरचा हिवाळा अजून यायला
आहे अवकाश.
ही पावले, ती पावले : कुठल्याशा पठारावर उगवणारे
सारिकोल नावाचे सोनेरी गवत, किंवा हलकेसे गाव.
मी पोहचण्या अगोदरच हे थडगे येऊन उभे
राहिले पाठीशी.

२

शिशिरमार्गी शब्दांचे उद्ध्वस्त मुलूख,
भूकंपासकट गंडांतर आणणाऱ्या नद्या
कोणत्या डोळ्यात साठवू ?
परतीच्या घोड्याला कोणासंगे पाठवू ?
हा अंतराळउणा ऋतू असता तर
कदाचित बर्फालाही फुले आली असती...

मेंदूच्या घळीत वितळलेला पुखराज...
हा, तो, पुढे, मागे; सगळीकडून अंगावर
येत आहेत हिमनगांच्या टोळ्या.
यात्रेमध्ये हात सुटलेले मूल नाही शोधायचे
तुम्हाला. यात्रा तुटल्यावर मीच तपासून
घेईन तुमचे चेहरे.

## ३

प्रार्थना संपल्यानंतरची खिडकी. नक्षीवंत झरोका.
विंटर्न्स टेल ज्याला म्हणतात; ती असते मुळात
बर्फाची पांढरी शुभ्र खार;
हृदयावर नेमाने केलेला रक्तमधुर वार...
इथून बरीच दूर आहेत झाडांची दिशाभुली अरण्ये;
स्वच्छ पाण्याच्या भूमिगत विहिरी.
तुझा पोषाख थकलेला आहे; आणि तो बदलायला या
आसमंतात जागा नाही. फक्त बर्फात फसलेले झाडांचे
सांगाडे. चांदणे दिशापालट करतेवेळी पापण्या झाकून

अंधार करता आला तर पाहा...

४

राजपुत्रा,
काही आठवत नाही
शिशिरबाळांच्या आईने फोडलेल्या मुठी,
तिच्या घनगंभीर केसांत अनाहूतपणे
शिरलेला पाचोळा;
मृत्युकुळातून येणाऱ्या सोबत्यांच्या हाका
एवढेच राजपुत्रा.
लयदात्री बर्फाच्या राजहंसा, क्रांतीत तुझा
खून झाला म्हणतात...
हे हलकेसे चर्च, एकाकी माधुर्याचे विभक्त स्मशान
उरलेल्या खाचांमध्ये शिरत नाही धीर सुटलेले अस्मान...

५

आता हे कुठले वाद्य वाजतेय् ?

कवितेच्या गळ्यावरचे
धारोष्ण रक्त.
य तळव्यापासून वाळू अशीच निनादत जाणार
रेशमाच्या झुळझुळत्या झग्यात मद्याच्या सावल्या
मोजणाऱ्या वक्षउभार मुली.
अंगधूळ गाण्याने थकलेला देश.
आक्रांताने बुबुळावर मारलेली पाखरांची झडप
कशी चुकवू?
लयभोर करुणेचे हे दोन थेंब कुठल्या पापण्यांत ठेवू?

६

हे राजपुत्रा,
या उजाड हिमगुम्फातून ऐकू येणारे जन्मोत्सव
आईची गाणी
बाळांचे रडणे.
टेबलावर भाकरीची उतरंड
द्राक्षवेलींचे छिनाल अश्रु.

टिचभर राहुटीतील एवढा प्रदीर्घ कल्लोळ
आणि बाहेरच्या बर्फावर पसरलेले
भयसंपन्न अंतराळ...

७

राजपुत्रा,
दुःखापासून काही मिळते का ?
अशक्त कुबड्यावरचे गोजिरवाणे हात
मांजरांना टोपलीत भरून पहाडगीते गाणाऱ्या बायका.
शब्द असा करतो विश्वव्याकुळ ?
मावळते चंद्र कुठून आणतात मग ही अपरंपार धूळ ?

८

थांबा;
डोळ्यांत कचाकच आकडे कुणी
खुपसले होते ?
तुम्ही रडू नका बायांनो.
किती लांब तुमचे केस ?

अणकुचीदार तुमची बोटे !
एकेक करून निघून जा कशा या एकरंगी
सुजाण वाटेने.

९

म्हणतात बर्फ ओसरल्यावर वाराही फूलपिसारा
झटकून टाकतो.
राजपुत्रा,
वाराही फूलपिसारा झटकून टाकतो.
अंजिराच्या झाडाखाली तू वाजवीत असतोस
पियानो;
एवढ्या अपरात्री...
धर्मशाळांतील हरिणांचे ओलेगार कातडे
राखायचे असते
मला.

१०

बर्फवादळात निषिद्ध असलेले पठार

पाण्याचा फुटलेला तुकडा,
युद्ध संपल्यावरचा आंधळा बिगूल...
आयुष्यावर समांतर पसरलेला संधिप्रकाश.
राजपुत्रा,
शब्दांना ओळखीचे माणूस दिसले तर ?
दिवा विझल्यावर स्मशान रुसले तर ?

## ११

कानांवरून ओळीओळींने गाणे जाते
ते हृदयात येईल ?
इझीचेअरमध्ये फिड्ल वाजविणारी माझी
वयस्क मैत्रिण; पहाटेच्या गार वाऱ्यात
इझीचेअरमध्येच मेलेली
आढळली.
पहिली चर्चबेल !
क्रांतीनंतर लिरिकल कवींचे खून पडतात
म्हणून नाही म्हणत मी

राजपुत्रा.

१२

कोणत्या शिल्पकाराचे पाय सडले होते ?
दुःखावर दुःख रचीत कोणत्या हिमखंडांचे
पिरॅमिड झाले होते ?
कोणत्या झाडांचा बहर परतला होता इथून ?
राजपुत्रा,
कोण अडवून धरत आहे जळबिंबातील
ही संध्यामग्न
मुद्रा ?

१३

आता ही डहाळी सुकत जाईल
हे खरे आहे.
मला हवाच असतो दग्धमंत्र
खचित हिमगर्द स्वप्नांचा अंधारभोगी आरसा
तू आता थकलास

राजपुत्रा.
नीट मोजून ठेवू दे प्रत्येक बरगडीच्या खाली
नक्षत्रओळ.

## १४

मूठभर पहाडावर असलेल्या गावाला नसते रात्र.
हळूहळू हिंडत असतो
क्रमाक्रमाने मृत्यू,
देहकुळातील एकाक्ष कावळ्याला पुनःपुन्हा पडत
असते वाळवंटात स्थायिक झालेल्या
हिवाळ्याचे स्वप्न.
राजपुत्रा,
कुणाला रे विचारावे आपल्या घराचे
निनावी दार?

## १५

हा आवाज मला थोपवून धरतो
इथे.

पाठीमागून सिंहाचा कळप जातो आहे का ?
माझ्या सगळ्या सख्या आता संभोगग्लानीने
थकल्या आहेत;
चंद्रप्रकाश मलूल होण्यापूर्वी मला काढलीच पाहिजेत
बर्फात पुरलेली त्यांची वस्त्रे
राजपुत्रा.

## १६

राजपुत्रा,
ही माझी अलंकारशाळा.
आराखड्यात अडकलेले पुढच्या
शहरांचे बांधकाम.
तुला येईल; येईल का तुला या
बर्फाची करुणा ?
ईश्वरासारखे उदास माझे प्रेम;
मृत्यूसारखी नितळ माझी
कविता.

## १७

या महाकाय हिवाळ्याच्या रोखाने
मला कोण न्हाऊ घालतेय् ?
हिमगंधांच्या पुरातन छायांना कोण पुरवतेय
वासनाजर्जर थकलेली
कविता ?
या बर्फाच्या शुभ्र छातीवर कोण घडवून
आणीत आहे माझा
लयभंगुर वध;
राजपुत्रा ?

## १८

पाण्यातील माशांच्यासाठी मी घेऊन येईन
चांदीचे शिपले, आईसाठी ग्रीष्मचंदनाचे
भयाण गर्भाशय......
खंदकातूनच सरकणारे एकुलते सुयार.
सडलेल्या द्राक्षांचे आयुष्य उदास

शब्द.

राजपुत्रा,
बर्फाचे चाळ बांधून हा शेवटचा पक्षी तुझ्या
चाऱ्यासाठी निघालाय्.

....hardly had passed the funeral train....
........परिशिष्ट परिशिष्ट परिशिष्ट परिशिष्ट परिशिष्ट..

**पहिली : ती**

आजूबाजूला समुद्र गर्जतोय्. वर्तुळभोगी.
समुद्र गर्जतोय् आजूबाजूला
तिला इथे ऐकू येतेय् भूगर्भातील पाणी
एकू येतो तिला इथे चंद्रशाळेतील
अवांतर वारा.
अंगभर सावकाश पसरलेले हे बेट घेऊन

तिने भिंतीकडे सरकवला टेबल;
बशीत अर्धवट खुडलेले वैभवी ॲपल आणि
अंधाराच्या मूठभर कळ्या तशाच टाकून ती
खिडकीजवळ आली.
हा खण्ड पूर्वी इथे नव्हता; पाणीही नव्हते;
पाचूगार.
नव्हती, पक्ष्यापासून नष्ट होणारी झाडे.
मध्ययुगीन चुंबनाच्या सभ्य शैलीसारखे
हे चित्र तिला आकर्षक वाटले.
सूत्रधाराच्या तंद्रीसारखी एखादी हलकीशी
चक्कर टाकून बागेतून यावे असा
भास तिला झाला.
पिसारा खुडून खाणाऱ्या मोराच्या नाटकाचा
शेवटचा अंक आणि झडीच्या पावसात उभ्या
असलेल्या एका मुलाचे बाळगीत तिला
पूर्ण करायचे होते.

## चंद्र

मठात पाऊस नक्षत्रांचा, किनारलेल्या छाया
धुक्यात लपुनी बसे डहाळीं पिकलेले फळ न्याया.
शब्दकळींवर कशास धरिशी सुन्न नभाचे भान
माझा रावा भुलला कोठे त्याला शोधुन आण
शिल्प घडावे पुन्हा ढळावे पाषाणाच्या लहरी
कृष्णकातळीं झऱ्यात मेल्या घट भरताना पोरी.
ठार झडीची मळवट भरता भांग आडवा पडे
टिंबांच्या यात्रेतुन गळते शिवार नसले खेडे
कडेकपारीतून नाद ये टपटप जाई टांगा
भिंती हलता कळे न बिलगे कोण कुणाच्या अंगा
अस्थिवरचा केशर वारा नुपुर चांदणे मळके
मला कोवळी निद्रा देउन अंतराळ हो परके.
तुझी पाकळी मिठी मोकळी दिठी धरी ना तोल
की दुःखल चंद्र बोलवी मरणदरीतुन खोल...

## दुसरी : माशांचे डोळे

१

मी लहान होतो तेव्हापासून आवडतात
मला माशांचे डोळे.
काल संध्याकाळी असेल कदाचित्
एका मैत्रिणीने आपल्या माशांचे
काचघर दाखविले मला
का कुणास ठाऊक पण मला हृदयभर
रडू कोसळले.
ती गच्चीवरून वाळूत खेळणारी मुले
पाहत होती मजेत

२

ती म्हणते, माझ्या त्रिज्येत आभाळासकट
भगवा मेघही यावयास हवा.
असे कसे होईल !
विषुववृत्तावरचा मासा तुम्हाला रंगाचे

गाणे म्हणून दाखवील ?
तिचे पत्र इतक्यात नाही आले.

## ३

तिची भेट झाली म्हणजे मी तिला दाखवीन
डोस्टॉव्हस्कीचे जुगारी हात,
शिताफीने निसटलेल्या कॅरेमॉझॉव्ह बंधूंची कथा
शिवाय एका मायाळू विधवेची उपोद्बलक
पुरवणी :
चोळीशिवाय पातळानेच अंग झाकण्याचा तिचा
निग्रही हट्ट; तेवढ्या रात्री सगळ्या माशांचे
डोळे खुडून ती स्टेशनवर गेली होती...

## दोघी

पानांचे ऐश्वर्य आणि विग्रहवाद त्याला
नाही आवडला.
आवडला नाही त्याला झऱ्याच्या वाटेवरील

नारायणीचा रंगस्तूप...
एलीसची बाहुली !
डाव्या पायावरचा तीळ त्याच्या चिमटीत
तरीही तो उदास.
जॅप्नीज रेस्टॉरन्टमधील नैसर्गिक
उत्पाताच्या भीतीने लहरणारा पियानो...
त्याने संधिकाल गोळा केले;
हॉस्पिट्लमधील.
त्याने संधिकाल गोळा केले हाडांमधील.
त्याने संधिकाल गोळा केले;
ब्रॉथेलमधील.
घरी आला तो.
अध्याय जीर्ण झाले तरी तिचे संदर्भच संपत
नाहीत म्हणून जोसेफच्या बहिणीला कामावरून
काढून टाकले त्याने.
असे का केले त्याने ?
मग फिड्ल. काय करावे या उरलेल्या वाद्याचे ?

तारांवरची अंधारधूळ. एक शीळ घातली त्याने. उडवून दिली तिला;
तर स्वरांच्या प्रदेशात पाखरांचे पालाण पडलेले...
मी म्हणालो : याच का त्या जुळ्या बहिणी ?
नाही ! ही ब्रॉन्टे आणि ही डिकन्सून.

## पांढरा खडक

तळ्यात बगळा उभा खडक पांढरा ये पुढे
म्हणून प्रतिबिंब हे सहज चालताना अडे
उन्हात जळसावली मृगजळीं जसा पारवा
फुलात जळता त्वचा मधुर सांडणारी हवा...
तिथून वनदाट हे भयअरण्य माझ्या घरी
तरंग धरुनी जशा बुडत नाचती घागरी
नदीस करुणा न ये स्मृतिविदग्ध चाफेकळीं
विनाश स्वर ये तुझा किति सहर्ष माझ्या गळीं.
प्रदीर्घ अन् त्यातही तमपुराण सूर्यास्त हा
अशीच धर बाहुली उघड सावलीची गुहा
भकंप किति जाहले तरि न अंतराळी झरा

शरीर विटके तरी पदर तारकांचा चुरा...
विनम्र चरणातळीं चिरड आपुली तू कुळे
तुझीच सर चिंब ही उपट चांदण्यांची मुळे
मिठीत मरणार्द्रता गगन सांधताना तडे
तळ्यात बगळा नसे खडक पांढरा ये पुढे...

## तीन चरण

काही पत्रे आणि हलकेसे
छायाचित्र
परत पाठविण्याची व्यवस्था
केलीय् मी.
आईचे चोरून वाढविलेले केस
नाही पाठवता यायचे
मला.
प्रारंभीच नष्ट झालेल्या एका प्रदीर्घ कवितेचे फक्त
तीन चरण शिल्लक आहेत.
माझ्याजवळ :

काळीज धुक्याने उडते
तू चंद्र जमविले हाती
वाराही असल्यावेळीं
वाहून आणतो माती...
अवकाश थंड हाताशी
दुःखाचा जैसा व्याप
काळाच्या करुणेमधुनी
सुख गळते आपोआप...
पाण्यावर व्याकुळ जमल्या
झाडांच्या मुद्रित छाया
मावळत्या मंद उन्हाने
तू आज सजविली काया...

# संध्यामठ

सखे, हे जान्हवीचे खोल पात्र, देहभर फिरणारा वारा
आणि त्या पल्याडचा सार्वभौम प्रदेश माझ्या
पूर्वजांचा आहे. ऋतूंचे उल्कापात घेऊन;
उरलेल्या देवदारांच्या बोलीने उभे असलेले घाट,
उग्रव्याकुळ पुरुषी संधानांचे परमार्थ वेचणाऱ्या
माझ्या बापाची कहाणी आहे.
रक्तातील कळीं कळीं आणि हिमनगांच्या घरकुलातील
दिवा दिवा तसा उगवलेला मी. अमृताचे कुंभ
वक्षावर सांडून; ती तशीच उगवत गेली पुनःपुन्हा
प्रारंभापर्यंत. भूमीशी तिचे नाते...
झाकून घेतला तिने आपल्याच केसांच्या घनदाट
संभ्रमात शरमेचा चंद्र...
हे जोगिणींचे मठ आणि भोवतीचे शिलाखंड
माझ्या मातेला मिळालेले आंदण आहे.
साजणी, कधी गंगेचे ओंजळभर पाणी मठात
कधी तिच्याच तळाशी मठांचे प्रतिबिंब
अशी ही दुःखवैभवाची लिपी; मुक्तीच्या तंद्रीत

उडून गेलेले हंस. त्यांची ऐकताना गाणी; माझ्या मातेच्या मठातून हृदयाच्या आडोशाला येऊ पाहणारे गंगेचे पाणी...

# मुलगी

आयुष्य नाकारण्याचा आणि स्वीकारण्याचा
हा प्रश्न नसतो.
वाळूतील पाण्यासाठी घरकुले असतात.
ती बांधावीत; समजूतदारपणाने पुन्हा
त्यांची वाळू गोळा करून
ठेवावी.
मी केरळात होतो तेव्हा एक मुलगी भेटली.
त्यावेळी जुन्या चर्चच्या दुरुस्तीचे काम
सुरू होते. इटालियन संगमरवराच्या एका
तुकड्याशेजारी ती उभी होती.
फुले तोडावीत; फार तर ऋतूंच्या आविर्भावातील
सूक्ष्म फरकांची नोंद घ्यावी.
बस्स, एवढेच.
एक दिवस कुठलीही पूर्वसूचना न देता
ती मरून गेली.
साधे आहे इतकेच !

# नूरजहाँ

भांडणात तिचा प्रियकर मारला गेला
आणि भरधाव घोड्यांवरून निघून गेले
टोळीवाले. धारोष्ण रक्तात तरंगणारी
दोन कच्ची रानडुकरे झाडावर टांगलेली
आकाश कोसळलेले...

धुळींने भरलेला पर्शियन मखमलीचा जोडा
घेऊन ती हिंडते आहे राणीसारखी रानोमाळ.
लहानशी काळीं टेकडी पायथ्याशी उजाड
निद्रेला हरवून सोडणारी एखादी दंतकथा
इथे; इथे मावळतीचा जाळ...

सर्वांगाला चूड देण्याची तिची अध्याहृत शिकस्त
देहसंभव जसा उदाचा गाभारा : सारंगी रक्तपितीच्या
वेली...
वाळूच्या मायावी कणांचे कित्येक रंगीन दर्गे निखाऱ्यात फूल
अस्ताव्यस्त धुळींचे इतिहास- बदनाम देखावे

टोळीवाल्यांना भूल...
सारंगी : रक्तपिती : सारंगी : रक्तगुंफा : सारंगी : रडवेले

डोळे.

प्राचीन उद्‌ध्वस्त नखरा आणि नाकातील डंखाची बेसर;
घोड्यांचे रानटी संभोग; दूरच्या चकाकत्या सर्पांच्या वाती
अंगठीतील पुखराजाचे शुभ्र अत्तर; स्तनांची थंडगार वृत्ते
कंठात ठार चिणलेले केसर...

# झाडांची टिपणे

माझी झाडांची टिपणे तयार आहेत.
कालची पूर्ण रात्र मी जागून
काढली.
बाहेर चंद्र उगवला होता किंवा नाही;
की ताऱ्यावरच तरंगत राहिले
अख्खे आभाळ
माहीत नाही.
खिडक्यांवरचे पडदे आणि मेणाचे माझे
दिवेही अशी दिशाभूल करीत असतील.
डहाळी; एक संपन्न वाचाघात; कसा आला ?
व्युत्पत्तीच्या मागे तिसऱ्या शतकात मला
भेटली एक धर्मशाळा—
कोणीही तापसी तिथे नव्हता; गायीच्या
डोळ्यांसारखा धुळीत मळलेला एक पारवा
खांबावर बसून होता.
कधीतरी धारींचा एखादा कळप तळपत्या
सूर्यासारखा बुडून मेला असेल...

चांदणे माहेरी आले म्हणजे तुमचे माहेर
कुठे जाईल ?
पुरुष जातो एकदाच माहेरी.
सगळ्या टिपणांचे मिळूनही एक
स्तोत्र होऊ शकेल.
प्रियेश्वरीच्या प्राणपाव्यात कविराजांनी
मांडलेले लचकल्या डहाळ्यांचे संदर्भ
मला अजूनही सापडले नाहीत...
मी आत्ता असे करतो—
माझ्या टेबलावर लोकांच्या ब्लडवेल्डिंगचे
पाच तुकडे मांडतो;
माजघराचे दार किलकिले करून
तुझ्या तीन बांगड्या अडगळीच्या
खोलीत पुरून देतो;
म्हणजे उगवतील झाडे...

*10th of November : Many happy returns of the day.*

*I had been hungry all the years;*
*My noon had come to dine;*
*I, trembling, drew the table near,*
*And touched the curious wine.*

# गुलाब वाळवण्याची गोष्ट

१

गुलाब वाळवायला मुली निघून गेल्यात
तेव्हापासून ही सगळी बेटे
रिकामी आहेत.
पाणी उसळते आणि समुद्रही हलतो
बेटे हलत नाहीत.

२

बेटे सोडून गुलाब वाळवायला कुठे
जातात मुली ?
परतताना वाळलेल्या गुलाबांची
पाखरेही त्यांच्या हातून उडून जातात;
इथे इतके सुरेख ऊन नांदत असताना
कशाला या मुली पृथ्वीला
दुखवितात ?

३

माझ्या लहानपणी गुलाब वाळवण्याची

गोष्ट निघाली होती.
डोळे सुजल्याने मी लटके निजून
गेलो होतो.
तावदानांच्या मागे संध्याकाळ झटकून
मोठ्या शिताफीने घराच्या
एका कोपऱ्यात मी बसलोय् ;
थोडे ऊन मिळवून, कडेकपारी भटकणाऱ्या
मुलीचे गाणे तुम्ही ऐकविले, मला.
आणि मग गुलाबाची गोष्टच राहून गेली.

४

तू माझी मैत्रीण होशील ?
कधी होशील ?
कुठे होशील ?
काय देशील ?
मनावरून माझ्या पीस फिरणार ना ?
निर्गंध होणार माझी पाकळी पाकळी ?

वस्त्रे भिरकावून तूही होणार मरेकळी ?

५

कसे भराभर सुचत जाते गुलाबांच्या
आठवणीने !
वाऱ्याने दमलेले रंगतृतीचे शेत.
माझ्या हातातून सोडवून घेतलेले हात.
गुलाब वाळत असतील तेव्हाच्या
बेटावरची रात.

६

साधी उलथापालथ झाल्याने चांदीचा एक
दगड आपल्या कुशीतून ढकलून
देते ती हीच मुकाट जमीन का ?
मी रुसून बसतो त्या त्या वेळीं ही दगडावर
उन्हाची मोड घासत बसते !
गुलाब असेच वाळवतात का ?

७

बेटावर रातोरात बातमी पोचली हे मला
अगोदरच ठाऊक होते.
संध्याकाळी मी नेमाने ऊद जाळतो, तरी
त्या दिवशी मला निखारे सापडले नव्हते.
फार लवकर सूर्य गेला असेल का ?
आणि ऊद जाळल्याचा पुरावा माझे
डोळेही विझवू शकले नाहीत.

८

आता तू स्वतःला निर्दय म्हणतेस
मी फार हट्टी आहे.
माझा हा हात तुझ्या केसांतून गळून पडतो
का ते पहा; असे म्हणालो मी आणि माझ्या
हाताला काय काय झाले,
मावळते ऊन सरळ माझ्या पायावरून
दूर निघून गेले.

९

तुझ्याशिवाय आता मी राहू शकणार नाही
गुलाब वाळल्यावर कोणी
परतणार नाही.
अंधारात सखीची बेटे कशी दिसत असतील ?
पायाजवळचा ससा उचलून मी एकदा
समुद्रावर जाऊन येऊ का ?

१०

गुलाब वाळवायला मुली गेल्या हे
ठीकच झाले.
मी कधी कधी फार दूर निघून जातो.
हलक्या पाऊसविणीच्या सूक्ष्म उन्हातून
रिकाम्या बेटावर जुन्या मुलींचे
हसणे ऐकू येते.

११

या शहरातून त्या शहरात,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८७२२६ दि: ८१०५
क्रमांक २९३२ नों: दि: ३०/११/७४

चंद्रोदयाच्या पहाडात;
गुलाबांच्या सार्वभौम मरणात...
तू एकदा ये आणि पुन्हा निघून जा.
आपले माणूस कसे दिसते ते
उभ्याउभ्या पाहून जा !

१२

निजेच्या अनुषंगाने कोणतीही कथा सांगू नये.
हृदयातील ढगांचे डोळ्यांना
जामीन करू नये.
मी काय करू आता ?
सूर्यास्तांच्या निळाईवर झाडांच्या
नक्षींचा सर्वनाश कोसळता ?

१३

गुलाब वाळवायला मुली निघून गेल्यात
त्याच दिवशी बेटावरील सगळ्या

बाहुल्यांनी आपणहून समुद्रात
उड्या घेतल्यात.
खेळणी रंगीत असली तर असे अटीतटीचे होते का ?
रंगशक्तीचे काय करायचे मग
आपण ?

## १४

थांब. उसळू नकोस,
शांतपणे ऐक. दातातून सोडवून घे ओठ.
किती घट्टपणे बोटे गुंतवितेस ?
या पहाडाची एकट एकट बेटे काय
सहज झाली असतील ?
परक्यासाठी रडू यावे तसे काय समुद्र
सहज जमले असतील ?
गुलाब वाळायला लागले की बेटांचा जीव
जागेवर नसतो पोरी.

## १५

एका अस्तावरून दुसऱ्या अस्तावर
डोळे फिरवावे तशीच बेटे
असतील तर माझी हरकत नाही.
क्रम चुकला तर कासावीस होतो मी.
आता तू कविता करायच्या टाकून दिल्यास
त्याने काय होणार ?
मयूरसूक्तासाठी कोणताही मेघ पावसाला
किती दिवस अडविणार ?
सांग् ?

## १६

मुलींचे गुलाब वाळतील, उन्हाचे पारणे फिटेल;
तेव्हा तरी ही बेटे जवळ येतील काय ?
मुलींचे केस विंचरून द्यायचे
आहेत मला.
घोड्यांच्या गाडीत निजवून पर्वतशिखरांवरची

फुले नीट खाली आणायची
आहेत मला.

## १७

शहाण्या मुलाजवळ आपण अशा
किती वस्तू जतन
करायला द्यायच्या ?
तुला ठाऊक आहे का, मुलींच्या परडीतील
एकही गुलाब लाटांवर पडला नाही;
समुद्रात बुडून मेला नाही.
मुली चालत राहिल्या, तुकडे होईपर्यंत पायांचे.
वाटेत मुली आंधळ्या झाल्या असतील...
बेटावर दिवे लावण्यासाठी माझ्या घरावरून
पाखरेही उडाली नाहीत.

## १८

तुला हाक मारावीशी वाटते.

आठवणीने चांदणे रडवावेसे
वाटते.
सर्वांग जिरवून घेते त्या भाषेचे
नाव काय ?
अर्धमागधीच्या करुणेवरची साय ?

## १९

उच्चारातून सगळे सुघट होते;
कळते वळते सर्वांना.
बेटे नखशिखांत देखणी असतील
हे सांगवत नाही.
मुलींच्या पाठीवर गुलाबाचे ओझे
की परतीची घाई ?
जीव गोळा करून तू उच्चारलेला शब्द
कौलाराच्या फटीत अडकला;
ज्या भाषेत मी जन्माला आलो तिथेही
अनाथ वाटते मला !

२०

घरात काशाचे भांडे आहे एक
ते सापडत नाही.
ज्या फांदीतून तेल गळले तिथला
पक्षी बोलत नाही.
अंगोअंगी उन्हे माखून, वाळलेल्या गुलाबांच्या
होडीतून मुलीच बेटे घेऊन आल्या तर
केवढी तारांबळ उडेल माझी ?

२१

मी येतो. मी जातो. मी परततो.
मुली गुलाब वाळवायला गेल्या
तरी बेटांची काळजी निजू
देत नाही मला.
थोडी जवळ येऊन मनातल्या मनात
गाणे गुणगुणून दाखव.
पायाचे हाड कोसळले आहे ना, त्या कड्यांवर

उभा राहून पाहतो बेटे कशी
दिसतात ती !

## २२

गुलाबांच्या जन्ममरणाचा विषय मी
काढू शकत नाही.
ज्या भूमीने मला स्वप्न केले तिलाही
काही मागू शकत नाही.
एरवी नाही—
तोपर्यंत जवळ घे मला.
गुलाब वाळवायला मुली निघून गेल्यात
तेव्हापासून ही सगळी बेटे
रिकामी आहेत.

# पहाडी थिएटर

एका सुनसान पहाडीवर मी बांधले प्रचंड थिएटर
अवतीभवतीच्या मनुष्यवस्तीला कळावे म्हणून
त्याच्या शिखरावर ओळीने उभे केलेत चार जिवंत
कावळे; आणि बाजूला चांदीचे दोन संरक्षक सिंह.
माझा मेकअप आणि माझी भूमिका मी आदरमूलक
भयाने समजावून घेतली. ग्रीनरूममध्ये साठवून
ठेवले एक रांजणभर पहाडी चांदणे. दुर्मिळ.
रंगलेले अस्तित्व धुवून काढण्यासाठी.
प्रेक्षकांना मी आकर्षित करीन असा दुर्दम्य
आत्मविश्वास ठेवून त्यांनाच केला मी मज्जाव
फक्त थिएटरात त्यांच्या साइजचे फर्निचर
सूत्रबद्ध पद्धतीने मांडून ठेवले. माझी हॉबी.
कोण्या निर्मनुष्य बेटावर विषारी वनस्पती
उगवाव्या म्हणून चर्चमध्ये प्रार्थना करणाऱ्या
प्रीस्टप्रमाणे माझी भूमिका मी संपविली
रांजणभर चांदणे आणि ग्रीनरूम...
मी थकलो. अशी दमछाक. माझा घोडा

बाहेर बांधूनच ठेवला आहे. पहाडी मुलुखाची
एक रपेट मारून मी येईन. व्यवस्थित
थकल्याची खात्री झाल्यावर, उत्तररात्रीच्या
बेसावध प्रहरी माझे डिनर घेईन. तेही
मांडून ठेवलेच आहे. मद्यात बुडविलेल्या
शिळ्या ब्रेडचे तुकडे.

# आगगाडीच्या कविता

१

क्षितिज डोळ्यांपुढून हिसकावून घेणारे लाकडांचे ढीगच्या ढीग
देखावा आणि दिशा यांचा संबंध नाही; त्याच्याही मागे
वणव्यासारखे पसरत जाणारे अरण्य. दाट गर्द सावलीत
अचानक गुप्त झालेले थोडेसे पाणी...एखादा उंट.
मानेवर धरलेला पडका महाल पसरता पसरता ढकलून
देणे. हा खंड सोडून दुसऱ्याच खंडातून भटकून येणे.
ओळीने मांडून ठेवलेले वस्त्रभांडार; काजळ आणि
जंगल भक्तीची अति प्राचीन शस्त्रे; निष्काम विवस्त्र पुतळे.
डोक्यावर दीर्घ लांबीचा पूल आहे असे समजून आपली
दळदार लोखंडी चाके सोन्याच्या लगडीसारखी
मऊशार करून सरकून गेली आगगाडी.

२

लोहमार्ग तिकडून नेता आले असते असे मी
इंजिनियरला सुचवून पाहिले;
एका मेघासाठी दोन झाडांची मुद्दाम फारकत

करण्याचा त्याचा गळाभर कावा मला पटून गेला होता.
ऐन मध्यान्हीं माणसांच्या पीळदार स्नायूंना सूर्याच्या
आसूडाने शेकून काढण्याचे तत्त्वज्ञान तो मांडतो;
—आणि झाडांच्या मुळावर कचकन् बसणारे
कुऱ्हाडीचे घाव; तिची दुपारची धाड्धाड् किंकाळी
मला ऐकूच देत नाहीत.
या टापूत तुम्ही एखादे स्टेशन बांधून काढा; प्रत्येक
संडेला इंजीनियर मला भेटतो.
बारमध्ये मी पुन्हा पुन्हा त्याला सांगतो.

३

डोंगरदरी ते चंद्रहिल एकही स्टेशन नाही
रेस्टॉरन्ट नाही तसेच वाटेवर कंदीलही नाहीत.
शुक्रवार; संध्याकाळची प्रार्थना आटोपून ती
सरळ चालत जाते. मध्ये निश्चयपूर्वक ती थकते.
—आणि विसरून जाते तळपायावर तुरुतुरू
वाढत जाणारी पाईन वृक्षांची साल.

अंधार नसतो. प्रतिज्ञापूर्वक अंधार नसतो.
माळरानाप्रमाणे; एकाच सरळ रेषेत पाहत गेल्याने
तिचे डोळे अकालीच अधू झालेले असतात.
एवढ्या घेरदार प्रदेशात आभाळच आभाळ असते अपरंपार.
युद्धे विकणारी आगगाडी तिच्या समोर उभी असते...
नग्न; संलग्न; पहिल्या स्त्रीसारखी ती धावत
सुटते मुसळधार.
तिच्या डोळ्यावर दणकन् आपटतो तिचा चेहरा
—आणि मायेचे अग्निकोमल रूळ मागेच टाकून
इतक्या हळुवार ती निघून गेली असते की;
माझ्या खांद्यावरचा पक्षी फडफडतसुद्धा नाही.

## ४

बर्फ इतका बेसुमार पसरला की; लाकडांचे ढीग
आणि अरण्य यांचा एक पांढरा शुभ्र
खडकाळ प्रदेश झाला.
जागोजाग शेकोट्या; बिलगलेल्या.

मने सुनिश्चित
हळवे स्पंदन नाही.
मागच्या नाताळात एक मोठा लाकूडपहाड कोसळल्याने
चर्चही भुईसपाट;
म्हणून शहाण्या प्रार्थनाही नाहीत.
नाहीतर; अशा वेळी चर्चबेल सगळ्या बर्फाचे एक
सार्वभौम ध्वनिकांतार मागच्या मागे
सोडून द्यायची.
रूळ बर्फाखाली दबलेले. ती भरधाव घोंगावत येते
आंधळ्या प्रलयासारखी.
रुळावरून उडालेल्या बर्फाच्या चिळकांड्यांनी माझे
केस पुन्हा पांढरे शुभ्र झाले.

५

या पाठीवरच्या गाठोड्यात काय केले आहेस जतन ?
इथे पूर्वी कोणी आले नाही इतक्या
बंदोबस्ताने.
तू जिथे जाणार आहेस; खरोखरच आहे का

ते तुझे वतन ?
तू काहीतरी बोल ! हिमावर्ताच्या प्रदेशात
कशाला हवी ओल ?
गाडीला अजून खूप उशीर आहे.
तोवरच आपण थांबू.
हा हिरवाकंच बांबू तुला कुठे मिळाला ?
याने चढून तू गाडीच्या छपरावर बसणार
आहेस का ? पुढेही चढावे लागले तर कोणत्या
भूमीत घट्ट रोवशील हा बांबू ?
मी सांगतो; टाकून दे इथेच हा
निष्पर्ण ऐवज !
गर्दी नसते. ठार रिकामी असते गाडी.
हे अस्त, ते अस्त
इतके निर्धास्त असतात इथे...
इंजिनाशिवायही एखाद्या वेळीं चालू लागेल ही गाडी
तेव्हा तुझे अंग, हा बांबू
आणि लपवशील कुठे झाडी ?

# डॉ. झिवॅगोची कविता

तू येऊन जा. मी घरी नसेन. खुणेच्या
दगडाला किल्ली ठेवलीच आहे.
दुपारचे जेवणही टेबलावर मांडून
ठेवले आहे.

तुला हवी असलेली डब्लू. बी. यीट्सची
कविता; तिच्या कांतारब्रह्माची टाचणे
गुरुचरित्राच्या सहाव्या अध्यायात सुरक्षित
ठेवली आहेत.

मला उशीर होईल. वाटले तर थांब
नाहीतर खुशाल निघून जा
टेनिस कोर्टवर.

मी माशांच्या शिकारीला जाणार आहे
परस्पर लायब्ररीतून. येताना रात्र
होईल. दाराला कडी घालू नकोस.
ते फक्त लोटून घे...तुझ्या स्वप्नांना
स्पर्श केल्याचे तुला आवडत
नाही म्हणून...

मी कदाचित तसाच निघून जाईन झिवॅगो
आणि लॅराबरोबर बर्फाच्या देशात...
लॅरा निद्रिस्त असेल तेव्हा माझ्या विदूषक
प्राणांचा कंदील घेऊन उभा राहीन
दाराशी; लांडग्यांची भुंकणी पिटाळून लावीन
तोपर्यंत लॅराची झोप झाली असेल आणि
झिवॅगोची एक कविता...
तू मात्र दाराला कडी घालू नकोस;
ते फक्त लोटून घे.

# मृत्युघरातील टिपणे

तुमची भूमिका मी समजतो.
तुम्ही सावरासावर करू नका, अटीतटीच्या
एखाद्या उत्तराने या फुलबागेला
कुंपणही घालू नका.

पहिल्यापेक्षा शेवटचा अस्त प्रभावशाली व्हावा
म्हणून पॅलेस्टाईनच्या कटातून निसटून
इथे आला आहे हा घोडा.

परकेपणा नाही. हृदय भरून आले म्हणजे
आपण डोळे झाकून घेतो, सूर्य असला
तर पहाडामागे जातो;
उरलेल्या संधिप्रकाशात संपत नाही
तुझा विवाद्य शोक...
तेव्हापासून तो घोडा माझ्याकडे आहे,
त्याला कुठे ढकलून देऊ ?

हिमवादळातून परतलेले प्रवासी कधी कधी
इथून जातात; काचेच्या घरातून मी पाहतो
मेघ उजळतात आणि कोसळतात...

हाकांच्या संबंधी मला काही सांगता येणार नाही.
गेल्या कित्येक दिवसांपासून मी डायरी
लिहिणे सोडून दिले आहे.
माझा पायघोळ सनातन झगा, तुटलेल्या भिवया
पृथ्वीचा एकेक अवयव हातात घेऊन मी सध्या
वाचीत आहे डोस्टॉव्हस्की;
त्याची मृत्युघरातील टिपणे...

# घरातल्या कविता

१

## कॅक्टस्‌ची टेप

हॉस्पिट्लमध्ये संध्याकाळ येते.
फक्त महत्त्वाची ऑपरेशन्स संपवून ये...
लीली परत येते.

तिचा पाचोळ्यासारखा मनस्वी थकवा
दरवळत असतो;
केवढ्या कठोर आर्जवाने मी उदास
आहे.

हॉस्पिटलसारखा विसावा नाही.
सावकाश मोजून घ्या लीलीच्या
मुखोद्‌गत बरगड्या...
तिच्या हातात सहज मावून येतात
बांगड्या.

मला खूप महत्त्वाची कविता लिहायची आहे.

नैनितालमध्ये एका शिंप्याचे घर
आहे, बॅलन्सिंग स्टोनसारखे,
तशी.
लीलीने लहानसे; चिमुकल्या ढगासारखे
एक सुंदर मांजर होऊन जावेना !
हॉस्पिट्लमध्ये खूप प्रयत्न करूनही
रडायला येत नाही.
कॅक्ट्सची टेप तुम्ही ऐकली आहे का ?
माझ्याकडे आहे.
असेल, मैल दीड मैल लांब
हॉस्पिट्लमध्ये गाणे ऐकायचे नसते —
............गाणे म्हणता ?

२

**माझी बहीण**

तबेल्यातून बाहेर आलो तेव्हा

माझी बहीण दाराबाहेर उभी होती.
संध्याकाळचे माझे काम संपले होते.
मी बारकाईने तिच्याकडे पाहिले
माझी बहीण प्रौढ झाली होती;
भरलेल्या फळासारखी.

ओव्हरकोट; तिने घालण्यास मदत केली मला. तेव्हा
बाहीतून एक ढग निघून खाली
फरशीवर पडला
चक्काचूर झाला.

माझी बहीण हसत राहिली;
युद्ध संपलेल्या मैदानासारखी.

खरे तर मीच आणावयास हवे होते नोटपेपर,
खोगीर, हेअर पिन्स, माशांचे डोळे आणि
स्टॉकिंग्ज...
माझी बहीण रागवायचे विसरली असेल कदाचित्
इथून मला प्रश्नपांथासारखे ऐकू येत आहे;
मार्केट ... दुःखी बार्बाराचे नटवे सलून.

३

**वहिनी :**

कित्येक वर्षांनी जोसेफ घरी आला.
पाईन वृक्षांची शिशिरातील
वर्णने ऐकताना मधले
दार किंचित हलले...
वहिनी दारामागे उभ्या होत्या.
जोसेफ आपली परदेशी यात्रा शरीरासकट
घेऊन तरंगत येई.
पेन्ग्विन पक्षी : अ फ्लाइटलेस् बर्ड !
त्या वेळीं माजघरातून काकणांची किणकिण
ऐकू येत नसे.
वहिनी विधवा झाल्या होत्या.
जोसेफ अकस्मात् यायचा;
आवर्ताच्या पावसासारखा. तात्पुरते
आकाश घनघोर...

आणि मग खूप रंगीबेरंगी कापडांचे
जुने तुकडे मांडून वहिनी
वाकळ शिवत बसायच्या...
मला सगळे आठवते;
बालपणातील बैरासारखे.

**माझी कविता :**

१

ग्रेस माझे पाळण्यातले नाव नाही.
पोथी वाचताना वारा सैरभैर झालेला
होता आणि दारांच्या मागे असलेल्या
वेलींवर कंदील पेटून पडला होता.
काही वर्षांनी एका विश्रब्ध
रेस्टॉरंटमध्ये इन्ग्रिड भेटली !
आपल्या अणकुचीदार नखांनी
पाठीवरचा माझा सदरा तिने
फाडला; आणि हातातील तांब्याची

लालभडक मोहर ठेवून दिली.
रात्री तीनच्या सुमारास
श्यामगढहून पत्र घेऊन पोस्टमन
आला ! देहशिल्पाचा शेवटचा अपभ्रंश
वाळवीत असताना एका वैराण
नदीच्या मूठभर वाळूत उभी असलेली
माझी आई रामदासाला दिसली ...
तिचे नाव सुमित्रा.
मला सौमित्र म्हणता मग ?

२

कपडे बदलत असताना ती सगळी
दारे बंद करून घ्यायची.
आईचे डोळे मला कधीच
आवडले नाहीत. आम्ही शहर सोडले
तेव्हा रहदारी शून्य झाली होती;
फक्त एक मजूर पाठीवरचे ओझे

घेऊन आकाश नसलेल्या रस्त्याकडे
जात होता. गाडीच्या तावदानांवर
झरकून चार–पाच झोपड्या
सरकून गेल्या; जशी विटेवरची
अक्षरे ...ने ओठांनी पिऊन घेतलीत.

## ३

पात्रं बदलविणाऱ्या नदीत मी
डोकावून पाहिले तेव्हा माझे
काहीच ठरले नव्हते; फक्त
फिरकीच्या तांब्यातली गंगा
माझ्या हातात हिंदकळत राहिली ...
एका पाठोपाठ उभ्या असलेल्या
तीन नागव्या स्त्रियांसारखी
म्युझियम बघणारी माझी आई
संध्याकाळी कधीही घरी नसायची.
द्वेषाने माखलेले माझे उंच

कपाळ तडकले तेव्हा
तार आली !

# गुड नाइट मिसेस् नॅली डीन्....

१

पाऊस पडतो आहे. मला दूरातून आवाज येतात
पाऊस पडतो किंवा नाही हे एकदा
तपासूनच पाहायला हवे म्हणजे पहाडापलीकडे
जाऊन समजून उमजून पाहणी करावी मातीची,
झाडांची अनुमाने बांधील असतात
शिशिरांची.
मी समंजसपणा धारण केला तरी या ढगाळी
रेस्टॉरन्टमध्ये मला मेणबत्ती सापडेल
असा शकुन नाही...
तसे इथले दिवे, आपोआपच निरागसतेने
उजळू येतात; कवचमंत्रासारखे.
मी कॉफीही घेणार नाही, शिवणार नाही मद्याला
मिसेस् नॅली डीन येईपर्यंत.
मी मरण पाहिले; पण या बाईविषयी जबरदस्त
आस्था आहे मला. बाहुपाशातले लावण्यकाहूर
मरण पाहिले तिने म्हणून नव्हे—

सूर्यास्ताची वाट पहात ही तशीच उभी राहिली.
समुद्रही हटला नाही, आकाशही फिटले नाही;
तुम्ही हृदयाने रडत असाल, मला हृदयच
सहन होत नाही.

२

ती फार लांबून येणार आहे म्हणून हा उशीर
मी तंद्रीत नाही—सावध आहे. करुणाष्टकातील
उदासीसारखा.
ती कोणत्या दिशेने येईल ? मुरलँड्स म्हणजे
सत्यभ्रांतीचा प्रदेश, शरीरावर उगवलेले बोट-
बोट गवत; आणि बेलगाम तारुण्याचे
प्रच्छन्न विदुर हसणे...
ती येईल तेव्हा दिशा. ती येईल ती दिशा.
इथे रेस्टॉरन्टमध्ये गुप्त रीतीने दारूत रक्ताचा
थेंब मिसळतात अशी तळघरातील बोलवा आहे.
ख्रिस्तजन्मापूर्वी स्नेकवाइन प्यालेला ज्युडास !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८९२२६ दि: ६।८।८५
वर्ग २९३ २ नों. दि. ३।१।८४

ट्रेटर...
कुठल्याही अर्थाने, अनर्थाने माझ्यात उगवत
नाही तुमचे वास्तव. एक थोर पडकी प्रचंड
इमारत; सजला तर वाडा नाहीतर घोडा...
वैराणात संभवत नाही विस्तव.

३

ती येईल तेव्हाच मी हे रेस्टॉरंट सोडेन असेच काही
नाही. झाडांनी गावे आणि गावांनी पुरात
बुडून जावे अशी कविता मी वाचली होती;
मार्क्सवाद्यांची लिरिकल पोएट्रीच म्हणा ना...
कदाचित् मिसेस् नॅली डीन् वृद्ध झाल्यामुळेही
हा उशीर असेल; तटतटून फुगून येईल
तेवढीच रक्ताची शीर, छाटले जाईल तेवढेच
धडाचे मुंडके असे तुम्ही का म्हणता ?
सत्य मिळाले...
केव्हाचा पाहतो आहे; ब्राझील ते व्हिएन्नापर्यंत

मांसांच्या जटिलतेत अडकलेला ऑपेरा...
मूरलँड्स ही माझी खाजगी क्लब
शिकारीचा ओव्हरकोट, ॲरिझोनियन कॅक्ट्सचे
रोप आणि काळ्या गुलाबांचा गुच्छ वेटरच्या
हवाली करून मी एक बोटभर बातमीपत्र
खरडले, ' टू यू मिसेस् नॅली डीन्..गुडनाइट्! '

# रिॲक्शनची कविता :
# कै. तुकाराम वाल्होबा आंबिले

शहामृगांची पिसे, चिमणीचा चारा, सशाचे कान
जन्मापासून ऐकतो आहे मीही भूमीचे गान.
इथे काय तिथे काय उभा राहा वाळवंटी
उमाळ्याच्या अश्रूसाठी मला नको गाठीभेटी.
सगळ्यांचीच झाली सोय कुणी नाही इथे उभा
तुकाराम वाल्होबा आंबिले, कुठे आहे तुझी जागा ?
सुरांची बंदिश सज्ज आहे तुला गुंफून घेण्यासाठी
आकांताची पिंजून पिंजून सूक्ष्म नक्षी करण्यासाठी
बेशरम रांडेने चालून यावे दिवसाढवळ्या माझ्या घरी
तुझा मेणा वाहून जसे मरून जाती वारकरी …
क्रांतीचे तुला दिले आज यांनी भव्य कोंदण
नवरा मेला विधवा झाली तरी कपाळीं तिच्या गोंदण.
चार लोक खांदा देतील म्हणून काय हुरळून जाऊ
फुटक्या कवटीत तुझा मेंदू कोणासाठी भरून ठेवू
नाळ तोडा, गर्भ गाडा तुझे शब्द माझे पाप
रक्ताचा ना वंशाचा; स्टीफन झ्वाइग माझा बाप

भासांच्या जटिलतेत अडकलेला ऑपेरा...
मूरलँड्स ही माझी खाजगी क्लब
शिकारीचा ओव्हरकोट, ॲरिझोनियन कॅक्ट्सचे
रोप आणि काळ्या गुलाबांचा गुच्छ वेटरच्या
हवाली करून मी एक बोटभर बातमीपत्र
खरडले, ' टू यू मिसेस् नॅली डीन्..गुडनाइट्!'

# रिॲक्शनची कविता :
# कै. तुकाराम वाल्होबा आंबिले

शहामृगांची पिसे, चिमणीचा चारा, सशाचे कान
जन्मापासून ऐकतो आहे मीही भूमीचे गान.
इथे काय तिथे काय उभा राहा वाळवंटी
उमाळ्याच्या अश्रूसाठी मला नको गाठीभेटी.
सगळ्यांचीच झाली सोय कुणी नाही इथे उभा
तुकाराम वाल्होबा आंबिले, कुठे आहे तुझी जागा ?
सुरांची बंदिश सज्ज आहे तुला गुंफून घेण्यासाठी
आकांताची पिंजून पिंजून सूक्ष्म नक्षी करण्यासाठी
बेशरम रांडेने चालून यावे दिवसाढवळ्या माझ्या घरी
तुझा मेणा वाहून जसे मरून जाती वारकरी ...
क्रांतीचे तुला दिले आज यांनी भव्य कोंदण
नवरा मेला विधवा झाली तरी कपाळीं तिच्या गोंदण.
चार लोक खांदा देतील म्हणून काय हुरळून जाऊ
फुटक्या कवटीत तुझा मेंदू कोणासाठी भरून ठेवू
नाळ तोडा, गर्भ गाडा तुझे शब्द माझे पाप
रक्ताचा ना वंशाचा; स्टीफन झ्वाइग माझा बाप

संताळ्यांचा दिंडी-गजर कुठे कळस कुठे पाया
मुक्तिवाल्या हरामांना आज लागे तुझी माया.
पाठ केल्या उत्तरांचे प्रश्न फितूर ओढून नेती
हलकट भडवे हृदयामधून चंद्र काढून फेकून देती...
काही सुखाचे, काही दुःखाचे याचा नाही मला धोका
माऊलीचे दूध प्यावे असा नाही धरला हेका...
फक्त घेऊन तुझी शपथ क्वचित् कधी आर्त झालो
सागरात पाणी असून बाळवंटात बुडून मेलो...
खुनाचीही धमकी देतील चार हिजडे त्यांची हिंमत
अस्वल आणि दरवेशी कोण कुणाची बघतो गंमत...
इथे गल्लत पुन्हा दगा गल्लीबोळ सारे भकास
हिवाळ्यातील संध्याकाळी चोरून नेले कोणी आकाश...
एक फकीर संतापाने आपली नखे तीक्ष्ण करतो
अंधार ठेवून डोळ्यांपुढे आपलीच आतडी फाडून खातो
दबा धरून होती माणसे एकच केला त्यांनी गिल्ला
हृदयावरती त्याच्या पुन्हा गिधाडांचा सुंदर हल्ला...
तू गेलास कान्होबाचा असा टाहो भारी झाला

शब्दासाठी मरणाऱ्यांचा आक्रोश माझ्या मागे आला.
माझे सुतक पाळू नको आभाळाला आहेत खांब
माणूस जेव्हा हाक देईल तेव्हा मात्र थोडा थांब ...

# एकान्त

खूप दूरपर्यंत ती भटकायला जाते;
संध्याकाळ व्हायची ती टळली नाही
तरी गुरांनी धूळ उधळण्यापूर्वी
ती निमूट परत येते.

सगळ्या पडक्या देवळांचा मिळून
उभा असतो एक मजबूत एकान्त;
नर्तकीच्या प्राणातील देहपिंजर
लयीसारखा.

तशा या सगळ्याच बालपणातील
आठवणी असतात;
पण हॅम्लेटच्या वेडाला अंतर्वेधाचा
पृथ्वीगोल असेल तर...
पहिल्याचा गळा दाबल्याने दुसरे मांजर जगेल
म्हणून आपल्या चिमुकल्या मांडीवरचा
परडीभर कापूस ढकलून देणारी
तिची मधुर बोटे.

अरण्यातील हिवाळी वेलीप्रमाणे दृष्टीच्या

उत्खननातून बेसावधपणे वर
येणारे शहर.
मागे हटता हटताच ती लपून बसते
थेट आपल्याच मागे...
मग तिला सावकाशीने आवळून जातात
स्पॅनिश संगीतातील
आलंबनविभाव.

# दफनविधी

हॉस्पिटलमधील भयाण अंधार एकत्र
जमवून कोण्या रसिक नर्सने
खिडकी शेजारी वाढविलेले
भडक फुलांचे झाड.
चुकलेले प्रहर आयुष्यात शिरावेत,
तसे नसेल नर, जीभ रीव्हजच्या ध्वनिमुद्रिकांचे
तुकडे करून अंतरिक्षात भिरकावून द्यावेत...
तशीच अचानक गलबलून जाणारी पाखरे
आम्ही लपवून ठेवलेले आपले आवाज
चोरून ऐकण्याचा प्रयत्न करतो
तुम्ही काय करता ? रडता ? हसता ?
शिल्पबद्ध आलिंगनात गाडलेला बंगला
आणि त्याच्या छतावर रडणाऱ्या
चौदा पाली...
विजेच्या अग्निलोळात मरून पडलेले
डोंगरचर्च आमच्या डोळ्यांसमोर असते.
आम्ही एकत्र जमतो, घाईघाईने त्याचा

दफनविधी उरकून टाकतो!
कफन पांघरल्यामुळे आमच्यापैकी एकाला
मायकोव्हस्कीची उचकी लागून ओकारी येते...
आम्ही थेट पळत येतो हॉस्पिट्लमध्ये.
नर्सने इतरांचे डोळे फोडून आमच्या पेल्यात
भरून ठेवली असते व्हिस्की...
अपरात्रीच्या संभोगात पाय गमावून बसलेल्या
छप्पन्न घोड्यांना तबेल्याबाहेर घालवून उचकीवाला
हॉस्पिट्ल टाकून पळून गेलेला असतो...

*I heard a fly buzz when I died.*
*The stillness in the room*
*Was like the stillness in the air*
*Between the heaves of storm.*
*The eyes around had rung them dry.*
*And breaths were gathering firm*
*For that last onset when the king*
*Be witnessed in the room.*
*I willed my keepsakes, signed away*
*What portion of me be*
*Assignable, and then it was*
*There interposed a fly,*
*With blue, uncertain, stumbling buzz*
*Between the light and me,*
*And then the windows failed and then*
*I could not see to see.*





# डार्लिंग

१

समुद्र इथेही नाही
समुद्र तिथेही नाही
कुठेही नाही समुद्र.

आतल्या उमाळ्यांचा शोध लागत नाही,
गहिवरांचे फूल फिटत नाही.
आवाज येत राहतात; स्तनांवरून
नेमाने वाहत जातात शुभ्र वजनदार तारे.
संततधार झडीने झिंगलेले चांदणे,
अधांतरी लोंबकळणारी 'मॅजिक् इन द मूनलाइटची' खुनशी टेप;
चांदण्यात हातात हात घेऊन भटकल्यासारखे वाटते मला.
काचेचे रंगउदार वाळवंटी मद्य आणि त्यात सतरांदा
बुडून बुडून वर येणारा नखाएवढा मासा...
डार्लिंग्! ही कपटी स्त्री आहे. मला केसांतून हात फिरवू देत नाही;
सूर्यफुलांच्या शेतातून रक्ताचा कालवा काढू देत नाही,
देत नाही, अर्धेमुर्धे चुंबन मला.
संभोगपूर्व भीतीचा सगळा लयकारी नखरा हिने
मुद्दाम दडवून ठेवलाय् पहाडी गुंफात.

२

आठवणी येताहेत जन्मापासून

जन्मापूर्वीच्या. जन्मानंतरच्या. गर्भाशय हादरले,
तडकले, जागोजाग तेव्हाच्या.
आठवणी येताहेत तळघरातील भातुकलीच्या शेजारी
निवांत निजलेल्या अधोरेखित टिपणाच्या.
डार्लिंग ! वाळूची तहान आईकडून, बर्फाचा आधार बापाकडून,
त्या द्विदल फुलाच्या. कंठात बुडालेल्या चंद्राच्या.
आठवणी येताहेत पहाडामागून, पहाडापूर्वीच्या.
एका उपनदीचे नाव डार्लिंग.
आठवणी येताहेत गंधशोकाने निर्वंश झालेल्या मेंदूच्या.
शहामृगांच्या पिसांनी आभाळ झाकल्याच्या.
पाऊसपिसात अडकलेल्या सत्याभासाच्या.
शहामृगांच्या पिसासारखा अखंड तरंगता पाऊस !
आठवणी येताहेत वाळलेल्या केसांवर
गवत उगवल्याच्या.

## ३

तुझ्या टेकडीवरच्या घराभोवती पाऊस कोसळतोय डार्लिंग.

एकांताहून ठेंगणा, मृत्यूहून थोर.
पाऊस कोसळतो ती सार्वभौम जागा.
आणि उरलेल्या जगाचे तुकडे तुकडे...
त्यांची सुटी सुटी अनाम बेटे माझ्या बुबुळातून
आरपार चकाकत जातात...
भाषा कोसळल्यावरचा सुनसान अर्थ माजवणारा,
कातडीच्या एकुलत्या एक आवरणाची शरम पिऊन टाकणारा
पाऊस.

४

गाणे संपल्यावर बरगड्या नीट मोजून
ठेवायची ती.
नाहीतर दुःखही पेलायचे नाही तिला.
पावसाचे अनेक अर्थ संभवतात.
या पाऊसशैलीला पर्याय नाही डार्लिंग !
—की या परिसराच्या मायेची सूक्ष्म जाळी
दाखवीत असते—सत्याला सावरणार नाहीत
अशी सक्तीची प्रतिबिंबे ?

५

संगमरवराच्या तळघरातील तेवणाऱ्या मेणबत्त्या;
मुळातळाला स्पर्श करून पुनःपुन्हा अलगद
वर येणारा पावसाचा नाद.

वाळवंटे फक्त वाळूचीच नसतात डार्लिंग !
फुलांची असतात, झाडांची असतात,
घरांची असतात, शहरांची असतात.

आणि अनाथ अंतरिक्ष तर नव्या
सौंदर्यजटिल साक्षात्कारी वाळवंटाचा
एक साधा प्रारंभ असतो...

पहाडी स्त्रीच्या भयगंभीर छातीसारखा
पाऊस कोसळतोय
पहाडी स्त्रीच्या अतर्क्य खोल डोळ्यांसारखा...
तुझ्या गाण्यातील भेटी-गाठी कापरासारख्या
उडून गेल्या डार्लिंग !
केशरासारख्या जपायच्या असतात त्या

६

अध्याहृत दुःखासारख्या सगळ्या पहाडी स्त्रिया
टेकडीच्या पायथ्याशी
येऊन उभ्या राहतात.
आश्रयाला येतात, वाऱ्याला मंत्रून जीर्ण शीर्ण
पाखरांची पिसे.
कित्येक वर्षांपासून पाऊस येत असतो,
येतच असतो डार्लिंग !
मूठभर माती देऊन आईने पोसलेले पाशवी वाद्य
तुझ्या गळ्यातून खडकचाफ्यासारखे झिरपत असते...
झाडाला फांदी असते म्हणतात.
ते फक्त लाकूड असते, तुझ्या-माझ्याहाडा सारखे.
आणि फांदी ? लाकडावर लटकविलेले दुसरे लाकूड.
पाऊस चुकविण्यासाठी टेकडीला बिलगलेल्या
पहाडी स्त्रिया अंधारात सैरभैर होतात.
तुझे गाणे टेकडीवरून हळूहळू सरकत येते,
आणि या स्त्रियांचे निर्विघ्न, शांत मृत्यु

पाताळघरातील संगमरवरात निमूटपणे जाऊन
बसतात, आपआपल्या जागी !

७

दऱ्याखोऱ्यांतून, रानांतून, जंगलातून, अरण्यातून
वेगाने उसळत येतो पाऊस
हा पाऊस नसतो तसा !
रंगांध मोरांच्या दरीतून काळोखाचे लोटच्या
लोट वाहत येतात.
तडकल्या आरशांचे काचतुकडे आभाळात
टिकून राहतात.
कोणी केली तुझी हत्या डार्लिंग ?
मला काहीही दिसत नाही अंधारात.
तलवारीच्या तीक्ष्ण धारेने घुंगुरगजऱ्याचे
सूत्र मी तोडून काढले इतकेच.
स्वरांचे, फुलपाखरांचे पंख कापले नाहीत मी.

८

मला वेळीं-अवेळी रडायला येते ते
ते तुझे गाणे नाही.
आईच्या कुशीचा आशीर्वाद आहे तो !
कुठल्याही संध्याकाळीं दोन घरे भिक्षा
मागितली की माझे अंधारवर्तुळ पूर्ण होते !
विश्व आडोशाला आले तर माझ्यावर
उजेड पडेल डार्लिंग !

९

चर्चयार्डनंतर प्रार्थनामंदिर ओलांडूनही खूप पुढे सरकले हे वृक्ष.
विस्तारत गेले डहाळ्यांचे दुर्दैवी वंश.
तुझ्या घरातून फक्त दिसतो एक वेडसर प्रदेश.
पाऊस तिथूनच येतो. प्रत्येक वृक्षाच्या गळ्याला
बांधलेली घंटा सतत वाजत असते.
रेशमाच्या निसरड्या वस्त्रासारखी वसरून

पडते तुझी पातळ त्वचा. वृक्षवंटा कोसळत असतात
आणि तुझे निराधार गाणे इवल्याशा मद्याच्या पेल्यातून
निसटून थेट येऊन उभे राहते चर्चच्या अंगणात.
टेकडीच्या पायथ्याशी पहाडी स्त्रिया
फक्त आपल्या सावल्या सोडून निघून
गेल्या असतात;
वाळूत पुरलेल्या खुर्चीवर भुरभुर बर्फ पडायला
नुकतीच सुरुवात झाली असते.
अंधाराने तेही दिसत नाही मला.
मी आडोशाला गेलो तर विश्वावर
उजेड पडेल डार्लिंग !

१०

हाताला लागेल ती वस्तू मी पुन्हा
जागेवर नेऊन ठेवीत असतो.
खुर्ची, तुझे वाद्य, रोझरी, अर्धवट जळलेल्या
मेणबत्त्या, बुरशी चढलेले भाकरीचे तुकडे.

हादरलेल्या प्रत्येक वस्तूचाच एक स्वतंत्र
तुकडा पडत असतो तसा.
या खुणेचा अर्थ मला आकळत नाही.
कोणत्या छंदमयी पर्वाचे संसूचन
आहे हे डार्लिंग ?





नाही ! ऋतू बदलतोय्. आणि मंदपणे पाऊस येतोय्.
प्रत्येक ऋतूत येतो पाऊस.
खिडकीच्या बाहेर तुझे केस, कायेवर परतबोलीच्या
पावसाचे शिंपडलेले चार थेंब.
पाऊस म्हणजे मैलोगणिक शांतपणे सरकणाऱ्या
पक्ष्यांच्या अमित रांगा.
पाऊस म्हणजे मोरांच्या झुंडीला अचानक
लागलेल्या रत्नविस्ताराचे
भडक वणवे.

## ११

कोणत्या उपनदीचे नाव डार्लिंग ?
भर पावसात निश्चल असते, शांत असते
ती कुठली महानदी ?
दंतकथेतल्या भयाण, भर्जरी उन्हांत ज्या पहाडी
स्त्रीची बुबुळे जाळून, त्यांची राख गर्भवतीच्या
तुडुंब पोटाला फासतात, त्या गर्भाला आपोआपच

फुटतात सजीव गाण्याचे अवयव...
दचकत नाहीत पहाडी स्त्रिया;
काळ्याकभिन्न अंधारात फक्त एकमेकींकडे
डोळे मिटून पाहत असतात.

## १२

हिवाळ्याची पानगळ सुरू झालीय्
वृक्ष पोरके दिसतात मला.
चर्चमधल्या प्रार्थना पोचवीत हळूहळू
पसरत असतो माझा पाऊस.
आभाळाकडे पाहवत नाही मला.
दूर एक बर्फाचा उंचवटा दिसतो;
तुझ्या वाद्याच्या शेवटच्या तारेतून तो अधिक
अचूक येतो हृदयात.
तिथे पूर्वी स्टेशन होते लहानसे,
कधी तरी एकदा गाडी गेली होती तिथून
त्या वेळी मुसळधार पावसातही वृक्षाच्या गळ्यातील घंटा





वेगाने वाजल्या होत्या !
संज्ञेत अचानक गुप्त होऊन गेली
ती गाडीची किंकाळी.

## १३

हे फुलांचे ढीग पाहून मला आठवते इथल्याच
एका पहाडी स्त्रीची कहाणी;
अतीव कोमल सुरांचे अगणित तंतू
अदृश्य हाताने पिंजून काढावेत तशी.
खडकाच्या ओंजळींतील पाण्याचा गार वारा
हुंगण्यासाठी ती काठावर येऊन निजली,
नकळत तिच्या पापण्या जड
झाल्या आकाशभाराने; वाकल्या. मिटल्या.
आणि शहामृगांचा उन्मत्त कळप तिच्या
पिकलेल्या इंद्रियांना तुडवून पुढे
निघून गेला.
या दिव्यातले तेल कधी संपेल ?
कधी गडद होईल हा गांधार ?
कधी सडतील, हे फुलांचे शुभ्र, कोवळे ढीग डार्लिंग ?

## १४

अचूक हेरता येतात मला ढगांचे पोषाख.
समुद्रापासून नगर दूर
नगरापासून टेकडी दूर
टेकडीपासून दूर चर्च.
आणि स्टेशन बर्फात कायमचे निद्रिस्त.
मला असेही आठवत असते—
श्वास रद्द करून फडफडणारी जास्वंदी, रंगभारोभार
पक्ष्यांची शोकसभा...
मला इथूनही जाता येईल, मला तिथूनही
उठता येईल;
तुझ्या गाण्यातले वेषांतर पकडता येईल
दोन बोटांत. स्तनावर निर्दयपणे चढविता
येईल, हिवाळी पावसाचा झगझगीत
धारदार हल्ला.
पहाडी स्त्रियांची एकमेव खूण
ठाऊक आहे तुला डार्लिंग?

चेहरे नसतात त्यांना.
चिमूटभर सावलीत सावकाश वितळतात, मोजून
ठेवलेले उंटाच्या तळपायातील हिरे...

१५

पाऊस ढगातून येतो ?
मी ढगात जाईन.
नभातून येतात ढग ?
नभात राहीन मी.
नभे थेटच येतात अंतराळातून ?
अंतराळ पाहीन मी.
गाण्यातून शब्द येतात ? शब्दांचा होईन मी.
शब्दांना अर्थ असतो ? अर्थ वाहीन मी.
तळपायांना आग लावून मेंदूवर रचून
ठेवीन मी, बर्फाची सगळी अरण्ये...
गाणे ऐकू आले तर मीही होईन
बिनचेहऱ्याची एक
पहाडी स्त्री !

## १६

गाणे प्रसरण पावते.
त्याच्यावर असते अनुभवाचे दडपण.
पाऊस पसरत जातो, दिशाहीन होतो
त्याला नसतो साजण.
वेलीही क्रूर नसतात, फुलेही
मधुर नसतात.
स्वप्नांची स्तोत्रगीते गाणारे टेकडीवरून
आपले वाद्य ढकलून देतात !
जराही हटत नाहीत, पायथ्याशी गुंग
होऊन पडलेल्या पहाडी स्त्रिया !
माझ्या ऋचा, माझी सूक्ते, माझ्या कविता;
मोडलेल्या उन्हातून गरगरणारी आरशांची
संपृक्त धून.
डार्लिंग, वर चढून आलो तर उचडून पाहीन
मी तुझ्या पाठीवरचे दोन रंगहीन तीळ ...

१७

खरे तर मला संध्यामग्न पुरुषाची लक्षणे
सांगावयाची आहेत.
अर्ध्या शरीराने मला पूर्ण लपेटून
घेतलेस तू.
तुझे केस मोजत बसतो मी.
स्तनपान करवून घेतलेस माझ्याकडून,
तुझे पाय खुडत बसतो मी.
कसा असतो पाऊस डार्लिंग ?
जसे एखादे शहाणे शतक उन्हाच्या देदिप्यमान
डोहातून वाळूवर वसतीला टेकते ?
डार्लिंग, पाऊस मुका असतो ?
जसे पिळलेल्या तारांनी ऋतुहीन वाद्याचे आतडे तुटते ?
कधीही न पाहिलेल्या, न ऐकलेल्या
जनावरांची एक मिरवणूक
जाताना मला दिसते सतत; वृक्षहीन,
निर्मनुष्य पठारावर.

चांदण्यात उरलेली, रक्तासारखी मऊ मऊ वाळू
नक्षत्रानक्षत्रावर लहरत जाते.
कोणत्याही गावातील फकीराच्या वेशीवरील
घरासारखा माझा आवाज
काफीर होत जातो.
संध्याकाळी सगळे परतून येतात—
उन्हे, पक्षी, झाडे, घोडे, पहाड, दिवे, थवे,
नावे, सगळीं गावे, अंधारकाजळींने मनःपूर्वक
रंगविली जातात.
एखाद्या स्टेशनवर अर्ध्या शरीराचा मुशाफीर
निरोपाला उभा असतो !
कोणत्या तरी ध्रुवावर खरोखरच सापडेल
का मला पहाडी स्त्रियांचे मूलस्थान ?

१८

टेकडीपासून तो फार दूर नव्हता.
तसा तो क्वचित कुणाला

दिसला असेल.
हिवाळ्याच्या पहिल्या चरणात घंटा वाजायची;
रात्री, बेरात्री, मध्यरात्री, अपरात्री.
संध्याकाळचे आभास सरसरून जागे
व्हायचे अंगोपांगावर.
प्रार्थनांच्यासाठी तिष्ठत उभे असायचे
जबरदस्त, ताकदवान पितळीं ऊन.
समोरच येईना, अभिमुखच होईना,
वेदनांचा नियंता, दुःखाचा स्वामी !
रानफुलांनी माखलेल्या पाऊलभर जागेचे
आणखी कितीसे तुकडे करायचे ?
गाण्यामुळे वृक्ष संभ्रमात सापडलेले असत—
त्यांच्या गळ्यातील घंटांना कीड लागलेली असे;
आणि दग्ध उच्चारांचे आरोप फुप्फुसांना स्पंदवीत असत !
डार्लिंग ! तुझी कधी भेट झाली होती का
शोकवंशाच्या या सिद्ध पुरुषाशी ?
पायथ्यापासून काही अंतर खूप फुले, तीच वाटेला बिलगून

बिलगून हसत जातात, पायाखाली हाकेशिवाय येतात.
पहाडी स्त्रियांचे सगळे समजले आहे मला.
त्यांचे मुखवटेही वाळू उपसली तर सापडतील,
बर्फ सारला तर लागतील हाताला कोणत्याही महानगरांच्या अस्थी
पायथ्याचा त्यांचा हट्ट मात्र मला केवढा
गूढ वाटतो ! !

## १९

माझे केस निर्वासितांसारखे वाऱ्यावर उडत असतात.
नीट करून देत नाही कुणी
मी काही तुला मागितले होते का ?
काही मागतो का तुला
मी डार्लिंग ?
जीवन कुशीत घेऊन, मृत्यू उशीत ठेवून
इथे आलो मी;
तक्काररहित रुजलो मी.
न्हालो आयुष्य पसरून, या ऋतुशून्य पावसात.

स्वीकार–नकाराच्या अंतिम तऱ्हा,
नृत्यसक्तीचे पैंजण,
शेवटपर्यंत जितके हात पडतील त्या
सर्वांचे वेगळे स्मरण;
पक्षी, पाऊस, वाळू आणि संध्याकाळचे कितीतरी
उदास संग,
वाजतात त्या चांदीच्या घंटा आणि
त्यांचेही तेवढेच रंग !
शपथ नाकारूनही काही मागता आले नाही मला.
मिठीला लगडलेली गूढवादाची नारिंगी वीण ?
गाणे म्हणजे तरी दुसरे काय असते ?
संगमरवरी बर्फात अंतर्धान पावलेली
काळीकरंद पहाडी स्त्री ?
घोड्यांचा पाठलाग करणारा शतकहीन पक्षी ?
आईला निजेतून उठविणारे शेणामातीचे मूल ?
गाडीतून उतरलेला शेवटचा मुशाफीर ?
स्वप्नात, खूप मागे, खचलेल्या प्रासादांच्या चिऱ्याचिऱ्यावरून

पाचोळा भटकत असतो—
तो पूर्ण विझलेला प्रदेश; थंड झालेले आकाश,
जी जनावरे त्या पाऊसप्रदेशात भिजली होती,
त्याच तंद्रीत काळाने स्थिर केले त्यांना;
मृत्यूने स्वीकारल्या त्यांच्या संदर्भखुणा.

## २०

निष्कर्ष उरतील ?
पोचतील कुठवर या विजनवादी गाण्याचे ?
सोन्याची सौम्य धूळ जिथल्या
एकांतावर अहोरात्र साचत असते
तसल्या एकाक्षरी प्रदेशात.
डार्लिंग, फोडता येणार नाही, तुझ्या कंठातील
आरशाचा निर्मोही तुकडा ?
वार्ता पसरत जातात, दुःखाशी संगनमत करून.
इथला पुरुष दिव्यांच्या कोमट
शेजेवर निजत असेल काय ?

त्याचा घोडा पाऱ्याचे जलाशय पीत असेल काय ?
लज्जेने अंग हळूहळू दुखत राहावे तसा वावरतो पाऊस इथे.
हाकांच्या सर्वत्र कल्लोळात ऐकू येतो पाऊस इथे.
तिथे स्टेशनात रिकामे करतो,
रिचवतो आभाळातील समुद्राचे राखीव साठे.
टेकडी सोडून तू उभी, गाडीची वाट पाहात.
विजेचा लखख स्वर तुझ्या
कंठावर पडला !
आणि हातातील वाद्यावर नंतर उभी
राहिली बर्फाची टेकडी.
पहाडी स्त्रियांची अंगरचना फार साधी
असते डार्लिंग !

२१

कितीतरी दिवस फुलांना नावेच दिली
नाहीत मी,
कितीतरी रात्री रंग वेगळेच केले

नाहीत मी;
कितीतरी प्रार्थना सूर्यास्ताअगोदरच
सोडून दिल्या मी.
मला त्याचा सुगावा लागेना, संध्याकाळच्या
कोणत्याही स्मरणात, वाळवंटी बांधणीचे
साधेसे सरणही पेटेना.
पक्ष्यांच्या चोचींनी एक एक पाकळी खुडून खुडून
माझ्या मेंदूचे एक सुंदर खडकाळ वर्तुळ करून टाकले !
संवेदनापाशी गाणे येते,
वाऱ्यावरची बर्फाळ टेकडी—टेकडीवरच्या राहुटीत
नुकतीच वाळायला घातलेली वक्षस्थळे...
पहाडी स्त्रिया कशा रडत असतील ?
रडायला लागते एक हृदय किमान,
दोन डोळ्यांची तहान !

## २२

मला दहशत घालते माझी करुणा,

खांद्यावरून घसरू पाहते भीति.
बेमालूम कोरल्यात मी माझ्या भिवया,
त्यांच्यावर शिंपडली ओली माती.
रस्ता तुडविताना मोडणाऱ्या दिशा. वस्तूला वास,
प्रत्येक अंगाला वास, गाण्याला वास,
बर्फाला वास, टेकडीला वास.
आणि पहाडी स्त्रिया ?
त्यांचे काय ?
माझ्या कपाळावर ठेवलेस कोणत्या नष्टनीड वेदनेचे श्वास ?
माझ्या भोवती बळेच निजवलेस कोणत्या खंडातील आकाश ?
कवितेसारखाही स्पर्शून गेला नाही
मला तुझ्या अंगाचा वास.

## २३

तुझे गाणे,
चालता चालता ग्लानीने थकून
मेलेली चिवट

पारव्याची पैंजणे !
वाद्यावर ताठ उभा असलेला
देवासारखा बर्फाचा खडक.
टेकडीचे संगमरवर झुळझुळत्या वाऱ्याने
पहिल्या रात्रीपासूनच नाहीसे होत आहे.
नाहीसे होणे म्हणजे नष्ट होणे का डार्लिंग ?
पायथ्याच्या पहाडी स्त्रिया कधी कधी
चक्क काळजासमोर
दिसतात.

## २४

हसतात माझे सगळे अवयव, स्वतःशीच, पृथक्पणे.
प्रत्येकाची वेगळी साद ऐकू
येते मला.
संभवापूर्वीच गोळा करून ठेवले होते मी,
माझ्या निर्मितीचे पुरेसे क्षण.
तुझ्या गाण्याच्या बर्फढगाळी झग्याखाली





दडवून बसविले होते मी त्यांना.
एका जराजर्जर घारीच्या डोळ्यातील अंजन.
ही घार या पहाडी स्त्रियांची स्वामिनी असेल काय ?
तुझ्या गळ्याभोवतीच्या विजांवर रक्ताचा
एकही थेंब दिसला नाही मला;

पण हिच्या चोचीने खुडलेल्या माझ्या आतड्याला
हे कसले कोंभ फुटले आहेत ?
पाषाणाचे शुभ्र, पीळदार आदेश घेऊन जाणारा
माझा जटिल चेहरा, मीही झोकून देऊ शकतो
चाकूने छिलून छिलून नितळ केलेल्या
कोणत्याही शिल्पवंत आरशावर !

२५

पाऊस येईल तेव्हाही.
पाऊस जाईल तेव्हाही.
विश्वरहस्याला मी जोडून देईन
या गाण्याची संहिता,
घनघोर केसांचे चरित्र,
माझ्या दुःखाची प्रणाली डार्लिंग !
किती जवळ दिसतोय् हा आस्थेचा पुरुष ?
एकाही पहाडी स्त्रीची भेट झाली
नाही त्याची.

संग्रहालय, ठाणे.

## २६

दुःखाने व्याकुळ झालेला वारा
वाहत राहिला. सर्वप्रहर.
इथला धर्मपुरुष मेल्यावर
कळले नाही कुणाला.
बर्फामुळे रंग ओळखता येत नाहीत म्हटले
तर बिनचेहऱ्याच्या पहाडी
स्त्रिया रडून रडून रडणार तरी किती ?

## २७

ये, मागे ये !
गाण्यावर ठेवता येईल टेकडीचा पायथा ?
वाऱ्याचा खडक ?
पहाडी स्त्रीचे उलटे गर्भाशय
देऊ शकेल त्याला धडक ?
मागे सर, मागे सर !
मी कुठल्या काठावर उभा राहू ?

ग्रं. क्र. १००७५
REFBK-0019075
REFBK-0019075

मेल्यावरही दिसला नाही, इथला नग्न पुरुष;
एका हाडाचा एक शिलालेख या कालसूत्राने ...

## २८

अखंड हिमवर्षाव होतोय् माझ्या
आयुष्यावर, आत्म्यावर, प्राणांवर, माझ्या दुःखावर,
माझ्या शोकावर, पहाडी स्त्रियांच्या ओटीपोटांवर,
धर्मपुरुषाच्या प्रेतावर, म्हाताऱ्या घारीच्या
अंजनगर्द डोळ्यांवर, तटतटून आलेल्या स्तनांवर,
अखंड हिमवर्षाव होतोय्.
हिमवर्षाव होतोय्, अंतरिक्षांतील अदृश्य चंद्रांवर;
कवितेच्या स्वप्नासाठी झुरणाऱ्या
शब्दांवर, पारा पिऊन अपंग झालेल्या
घोड्याच्या मांडीवर —
हिमवर्षाव होतोय् माझ्या डोळ्यांवर, पापण्यांवर, भिवयांवर,
विश्व आडोशाला आले तर माझ्यावर
उजेड पडेल डार्लिंग !